

Volume 8 (Special Issue 11)
April, 2018

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR
4.270
UGC Journal list No. 64768


१४ एप्रिल २०१८ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त...

# सामाजिक समतेचे प्रणेते - महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**Editor : Dr. R.V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

# "सामाजिक समतेचे प्रणेते : महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर"

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

## अनुक्रमणिका


| Sr. No. | Name | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 01 | Dr. Smriti Bhosle | Dr. Ambedkar's Dalit Liberation Approach | 1-4 |
| 02 | प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ | समाजसुधारक : महात्मा ज्योतिबा फुले | 5-8 |
| 03 | प्राचार्य, डॉ एस.एस. शिंदे | डॉ.बाबासाहेबांचा जीवनपट व शैक्षणिक विचार | 9-12 |
| 04 | Dr. Ashok Pitambar Khairnar | Dr. Babasaheb Ambedkar on the Annihilation of Caste and Buddha's Dhamma | 13-18 |
| 05 | प्रा. डॉ.टी.ए. मोरे | फुले-शाहू-आंबेडकर प्रेरणा - एक दृष्टिक्षेप | 19-22 |
| 06 | प्रा.डॉ. प्रकाश अर्जुन भामरे | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मविचार | 23-26 |
| 07 | प्रा. डॉ. सुरेश आर. वराडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारितेतील योगदान | 27-30 |
| 08 | प्रा.डॉ. विजय जी. गुरव | दलित साहित्य के प्रेरणास्त्रोत : महात्मा जोतीराव फुले | 31-33 |
| 09 | डॉ.विजया विनायक पाटील | स्त्रीयांविषयक कायदे निर्मितीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान | 34-37 |
| 10 | डॉ. संभाजी संतोष पाटील | महात्मा जोतीराव फुले यांच्या विधायक विचारधारेचा विश्लेषणात्मक अभ्यास | 38-41 |
| 11 | डॉ. भामरे नानाजी दगा | महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार | 42-44 |
| 12 | डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची चळवळ | 45-48 |
| 13 | प्रा.डॉ. आर.एम. साळुंके | जोतिराव फुले का हंटर कमीशन से निवेदन | 49-51 |
| 14 | डॉ. महेश व्ही. गांगुर्डे | म. जोतीराव फुले की ग्रंथ-संपदा | 52-54 |
| 15 | डॉ. भगवान सतन पाटील | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान | 55-57 |
| 16 | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना | 58-60 |
| 17 | डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | राजर्षी शाहु महाराजांची आरक्षण विषयक भुमिका | 61-63 |
| 18 | प्रा.डॉ.बालासाहेब किलचे | भारतीय लोकशाहीची सद्यस्थिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 64-67 |
| 19 | डॉ. चंद्रशेखर वाणी | डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विदेशात शिक्षण एक तपश्चर्या... | 68-70 |
| 20 | प्रा.डॉ.अंभुरे एस.डी. | छत्रपती शाहू महाराजांचे विविध कला क्षेत्र विषयक धोरण | 71-73 |

Late Ramesh Warpudkar College Sonpeth

# राजर्षी शाहु महाराजांची आरक्षण विषयक भुमिका

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** (समाजशास्त्र विभागप्रमुख)
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
ता. सोनपेठ जि.परभणी मो.८९८३७७६०७७

राजर्षी शाहु छत्रपती हे राजदंड ही शोभेची वस्तु नसून लोकसेवेचे ते एक प्रभावी साधन आहे. याची सर्वस्वी जाणीव असणारे एक राजा होते. शाहु महारांजांनी केवळ समाजसुधारणाच केल्या नाहीत तर मानवी जीवनावर प्रभाव टाकणारे कृषी, धर्म, उद्योग, व्यापार, साहित्य, नाट्य, संगीत, मल्लविद्या अशा विविध क्षेत्रात भरीव कामगीरी करुन आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाची भुमीका बजावली. शाहु महाराजांच्या व्यक्तिमत्वात विविध पैलू दिसुन येतात, त्यांनी प्राथमिक शिक्षण, वसतिगृहाची स्थापना , दुष्काळ व साथीच्या रोगांवर केलेली मात, आतंरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा , फासेपारधी वगैरेंचे पुनर्वसन , जलसंधारण, चहा - कॉफीची लगवड, आरक्षण धोरण या विविध क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन पाडले टाकली. काळ राजाला घडवितो का राजा काळाला घडवितो यांचे 'राजा कालस्य कारणम्' हे प्राचीन काळात देण्यात आलेले उत्तर भारताच्या इतिहासीक ज्या मोजक्या राजांना या यर्थार्थतेने लागू पडते, त्यामध्ये राजर्षी शाहू महाराजांचे स्थान फार वरचे आहे.

## शोध निबंधाचा उद्यिष्ट्ये :

१) राजर्षी शाहु महाराजांचे आरक्षण धोरण अभ्यासणे.

२) सामाजिक न्याय व समतेसाठी राजर्षी शाहुंच्या आरक्षण विषयक भुमीकेचा वेध घेणे.

## शोध निबंधाची गृहितके :

- आरक्षणधोरणामुळे ब्राम्हणेत्तर जातीतील मागासलेपण दुर झाले.
- आरक्षणामुळे उच्चवर्गीयांचे मक्तेहारी मोडीत निघाली .
- सामाजीक समतेसाठी शाहुं महाराजांचे आरक्षण धोरण फार महत्वाचे ठरले.
- आरक्षणामुळे समाजातील सर्वस्तरापर्यंत शिक्षण पोहोचले.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणीसाठी व्दितीयक स्त्रोतांच्या वापर केलेला असुन संदर्भग्रथ, पुस्तके, मासीके, इंटरनेट, इ. च्या मदतीने विचारांची मांडणी करण्यात आली आहे.

## विश्लेषणात्मक बाजु :

महाराष्ट्राच्या सामाजिक जडणडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल वाटा आहे. शेकडो वर्ष शुद्र मानल्या गेलेल्या जाती - जमाती वरीष्ठ वर्गाच्या सामाजिक , आर्थिक शेक्षणिक , राजकीय , सांस्कृतीक गुलामगिरीत थिजुन म. जोबिता फुले यांनी केले. त्याच्या निर्वाणा नंतर १९९४ मध्ये शाहू महाराज कोल्हापुरच्या गादीवर आले त्यांनी आपला राजदंड शुद्रातिशुद्रांच्या उध्दारासाठी वापरला.

२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापुरच्या राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी आपल्या राज्यातील प्रशासकीय सेवेतील ५० % जागा राखीव करण्याच्या ऐतिहासिक जाहीरनामा प्रसिध्द केला ही घटना भारताच्या सामाजिक इतिहासात युगप्रर्वतक मानली जाते. शाहुंनी असा जाहीरनामा काढणे म्हणजे केवळ त्यांची 'संस्थानी' लहर नव्हती वा त्यांना आचानक स्फुरलेली कल्पनाही नव्हती त्यामागे कोल्हापुरच्या राजाचा पन्नास वर्षाचा गतेतिहास होता. राजर्षी शाहुंच्या राजरोहणाच्या काळापासुनचे त्यांचे निरीक्षण आणि अनुभव उभे होते. सामाजिक असंतोष भारतीय समाजात खदरवदत असताना राजर्षी शाहुंनी उचललेले हे पाऊल क्रांतीकारक मानवे लागेल. म्हणुनच राजर्षी शाहुंचे चरित्रकार धनंजय कीर यांनी त्यांना 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा आगृदुन' असे म्हटले आहे. 'लोकांचा राजा' असणाऱ्या राजर्षी शाहुंचे आरक्षण विषयक दृष्टिकोन आजच्या आधुनिक भारतीय समाजाला उपयुक्त ठरणारे आहेत.

इ.स. १९८४ साली राजर्षी शाहुंनी राज्यांची सुत्रे हाती घेतली तेव्हा ब्राम्हणेत्तर लोकांची अधिकारी पदावर असणारी संख्या ही कमीच होती. अधिकाऱ्यांमध्ये इंग्रज, पारशी, प्रभु, ॲग्लो, इंडियन या वर्गातील लोक होते. म्हणजेच मराठ्यांच्या राज्यात प्रशासनामध्ये त्यांनाच त्यात स्थान नव्हते मग इतर मागासवर्गीयांचा प्रश्नच उद्भवतच नव्हता. एकंदरीत तत्कालीन भारतीय समाजात प्रशासनात उच्च पदस्थ जागी केवळ उच्चवर्गीय लोकांनाच स्थान होते, त्यांचीच ती मुक्तेदारी बनली होती. या पार्श्वभुमीवर राजर्षी शाहुंनी आपल्या संस्थानातील वरिष्ठवर्गाची मुक्तेदारी मोडायचे ठरवले. राज्याधिकार प्राप्त होताच नवे प्रशासन मंडळ स्थापन केले, त्याच बरोबर हजुर ऑफीस या एकानव्या महत्वाच्या खात्याची निर्मिती करुन त्यावरील प्रमुख म्हणून आपले गुरु रावसाहेब रघुनाथ व्यंकोजी सबनीस यांना नेमले. प्रभु समाजातील सबनीसांच्या नेमनुकी मुळे उच्चवर्गीयांच्या मुक्तेदारीस पहिला सुरुंग लागला तर भास्करराव विठोजी जाधव यांच्या सरसुभेदार या पदावरील नेमणुकीने दुसरा सुरुंग लागला. त्यानंतर दाजीराव विचारे या सुविद्य मराठा तरुणाची कार्यकारी अभियंता म्हणून नेमणुक केली अशा प्रकारे कोल्हापूर प्रशासनातील पारंपारीक मुक्तेदारीस उलथुन टाकण्याचे कार्य राजर्षी शांहुनी केले. यातच वेदोक्त प्रकरणाचा भडका उडाला होता. अशाच प्रसंगी शाह महाराजांनी सातव्या एडवर्ड बादशाहाच्या राजरोहणाच्या समारंभासाठी इंग्लडला गेले. तेव्हाही त्यांच्या मनात राज्याच्या उत्थानाचे विचार थैमान घालीत होते. उच्चवर्गीयांची प्रशासनातील मक्तेदारी मोडून काढण्यासाठी त्यांनी २६ जुलै १९०८ रोजी आपल्या राज्यातील मागासलेल्या प्रजाजनांच्या अभ्युदयासाठी एक अभुतपुर्व जाहीरनामा प्रसिध्द केला. २६ जुलैचा जाहीरनामा इंग्रजीत असुन तो संस्थानातील जनरल खात्यासंबधीत आहे तर २८ जुलैचा जाहीरनामा मराठीत असुन एकच तो खाजगी खात्यासंबंधी आहे.या दोन्हीतील मजकुर असुन त्या जाहीरनाम्यानुसार शाहुंनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयासाठी ५० % आरक्षण केल्याचे जाहीर केले. मागासलेली वर्ण याचा अर्थ ब्राम्हण, प्रभु, शेवणी, पारशी, व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज करुन सर्व वर्ण असा समजावा अशी सुचना शाहू महारांनी केली.

वरील जाहीरनाम्यानुसार हे राजर्षी शाहुंच्या मागासवर्गीयांकडे पाहाण्याचा विशाल दृष्टीकोन स्पष्ट होतो. ब्रिटिश सरकारची , उच्चवर्णी यांची कोणाचाही भीड न ठेवता प्रजानांच्या हितासाठी समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी हा अभुतपुर्व जाहीरनामा काढला. परिणामी महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांचे धाबे दणावले. आतापर्यंतच्या त्याच्या प्रशासनातील मुक्तेदारीला व सामाजिक ऐहिकवचस्विला यामुळे तडा गेला. छत्रपती शाहुंनी जाहीरमान्या नुसार प्रत्यक्षकृती करुन दाखविली यातच त्यांचे राजपदाचे उत्तरदायीत्व जाणवते.

## छत्रपती शाहु महाराजांच्या आरक्षण धोरणाचे परिणाम :-

छत्रपती महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी मागासवर्गीयांसाठी ५० % राखीव जागा जाहीर केल्या. त्यात त्यांच्या आरक्षण धोरणाचे परिणाम केवळ महाराष्ट्रावर झाले नाही तर संबंध देशावर झालेले दिसतात. आरक्षणा बाबत भारत सरकारने वेळोवेळी नियम जाहीर करुन शाहू महाराजांचे आरक्षण धोरण प्रत्यक्षात राबवले आहे. भारताच्या घटनेच्या कलम ३४१ व ३४२ नुसार अनुसूचित जाती अनुसूचीत जमाती घोषीत करण्यात आल्या व त्या नुसार आरक्षणाची अमंलबजावणी होत आहे. महाराष्ट्र शासनाने मागासवर्गी यांना तीन प्रवर्गामध्ये विभाजीत केले आहे.

शाहु महाराजांनी आरक्षणाच्या माध्यामातुन शिक्षिणाच्या क्षेत्रातील वरिष्ठ वर्गाच्या मुक्तेदारीस शह दिल्यामुळे पुढील दोन शतकात मागासवींय तसेच बहूजन समाजाचे प्रशासकीय सेवेतील प्रमाण लक्षणीय वाढले. १८९४ साली सरकारी सेवेतील मागासवर्गीयांचे प्रमाण ५.६३.% एवढे होते १९९२ साली ६२.११% गेले. यावरुन स्पष्ट होते की शाहू महाराजांनी घेतलेल्या ऐतिहासिक जाहीरमान्याच्या निर्णयामुळे प्रशासकीय सेवेतील मागासवर्गीयांचे प्रमाण वाढले. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या दृष्टीने केलेले सामाजिक , आर्थिक, शैक्षणीक, महिलांचे कायदे या संदर्भातील कार्य म्हणजे जाणता लोकराजा आणि कर्ता समाजसुधाकर असेच म्हणावे लागेल.

## निष्कर्ष :

आरक्षणामुळे भारतीय समाजातील पारंपारीक मुक्तेदारी सपृष्टात आली. आरक्षणामुळे प्रशासनात मक्तेदारी संपृष्टात आली. आरक्षणामुळे प्रशासनात बहूजनांचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे. बहुजन समाजातील स्त्रिया व मुलांचे शिक्षणातील प्रमाण ही वाढतच आहे. याचा फायदा त्यांच्या कुटूंबीयांना व समाजाला ही निश्चितच होत आहे.

समाजात सामाजिक समता निर्माण होऊन आरक्षणामुळे शैक्षणिक , सामाजिक उन्नती झाल्याचे आपण आज अनुभवतो आहोत. याचे सर्वस्वी श्रेय आधुनिक युगातील फुले- शाहू - अंबेडकर यांनी केलेल्या कार्याला दयावे लागेल. म.फुलेच्या मागासवर्गीयाच्या उध्दाराचा वारसा जसा राजर्षी शाहू महाराजांनी चालविला तसा राजर्षी शाहुंचा वारसा डॉ. आंबेडकरांनी चालविला. राजर्षी शाहुंच्या समगृ कार्याचे विवेचन करतांना चारित्रकार धनंजय कीर यांनी म्हटले आहे की 'सत्तेच्या उपयोग लोकोध्दरासाठी करावयाचा असतो हे तत्व कृतीत आनुण दाखवणारा हा आदर्श राजपुरुष होता.' बोले तैसा चाले या वचनाची सत्यचा पटविणारा वंदनीय नृपती होता.''

संदर्भ :

१) प्रा. डोईफोडे ज्योती, मुलभूत सामाजिक विचार, विद्याबुक्स पब्लिशर्स, आरंगपुरा, औरंगाबाद, जुन २००५ पृ. २६५- २७३

२) संपादन डॉ. इप्पर, प्रा. राठोड, राजर्षी शाहू महाराज सामाजिक सुधारणा व सद्यस्थिती, अरुणा प्रकाशन लातुर, मार्च पृ.९८,९९

३) डॉ. आगलावे प्रदिप, डॉ. आगलावे सरोज, समाजशास्त्र, डीनीटी ॲन्ड को. २००७ पृ. ५२,५३

४) रमेश जाधव, राजर्षी शाहू छत्रपती , नॅशनल बुक्स ट्रस्ट, इंडिया, २०१२ पृ. ३८, ४५

५) प्रा. कोंडेकर , समाजशास्त्र, फडके पब्लीकेशन, कोल्हापूर, २०१० पृ. ६२,६४

६) टिकेकर अरुण, देणे समाज पुरुषांचे,गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०११, पृ.६६,६७.

७) भिडे .जी. एल. पाटील. एन.डी. महाराष्ट्रातील समाज सुधारकांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१३, पृ.१०२, १०५

८) डॉ. शिंगारे अनिल, डॉ. घुले, महाराष्ट्रातील अंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर, २००९, पृ. ८६, ८८

९) प्रा. शेख प्रा. भद्रशेटे , प्रा. भालेराव, समाजशास्त्रीय विचारवंत अरुणा प्रकाशन, लातुर , २०१०, पृ. १४२, १४५

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

-------------------------------*****-------------------------------